● शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १४९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## महाराष्ट्राच्या करीना थापा आणि केया हटकर ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा’ने सन्मानित

**नवी दिल्ली -** महाराष्ट्राच्या दोन धाडसी आणि प्रेरणादायी मुलींच्या शौर्य आणि प्रतिभेचा सन्मान राष्ट्रीय स्तरावर करण्यात आला. अमरावतीच्या करीना थापाला शौर्यासाठी तर मुंबईच्या केया हटकरला तिच्या साहित्य व सामाजिक कार्यासाठी ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारा’ने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री श्रीमती अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री श्रीमती सावित्री ठाकूर व महिला आणि बाल विकास मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक उपस्थित होते.

या पुरस्काराचे स्वरूप पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे असून, यंदा १४ राज्यांमधील१० मुली व ७ मुले असे एकूण १७ मुलांना गौरविण्यात आले. यामध्ये शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण यांसारख्या विविध क्षेत्रांतील असामान्य कामगिरी करणाऱ्या मुला-मुलींचा समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावरून २०२२ पासून २६ डिसेंबर या दिवशी ‘वीर बाल दिवस’ म्हणून दोन्ही साहिबजादा बाबा जोरावरसिंग व बाबा फतेहसिंग यांना अभिवादन व शौर्याचे स्मरण करण्यात येते. शिख धर्मातील दहावे गुरु, गुरु गोबिंद सिंग यांचे सुपुत्र बाबा जोरावर सिंग (वय ९) आणि बाबा फतेहसिंग (वय ५) यांच्या अव्दितीय शौर्याला समर्पित या दिवसाला विशेष महत्त्व आहे. त्यांच्या बलिदानाचे स्मरण म्हणून हे पुरस्कार प्रजासत्ताक दिनाएवजी वीर बाल दिवस म्हणजेच २६ डिसेंबर रोजी राष्ट्रपती भवनात समारंभपूर्वक प्रदान करण्यात येतात.

**करीना थापाचे शौर्यः ७० कुटुंबांचे प्राण वाचवले**

अमरावतीच्या कठोरा परिसरातील जय अंबा अपार्टमेंटमध्ये १५ मे २०२४ रोजी लागलेल्या भीषण आगीच्या घटनेत करीना थापाने ७० कुटुंबांचे प्राण वाचवले. बी-विंगमधील एका फ्लॅटमध्ये आग लागल्याचे दिसताच, करिनाने प्रसंगावधान दाखवत कुलूप तोडून आत प्रवेश केला. सिलेंडरजवळील आग आटोक्यात आणत सिलेंडर बाहेर काढल्याने मोठा स्फोट होण्याची भीती टळली. तिच्या शौर्याची दखल घेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.



**केया हटकरः साहित्य आणि समाजकार्याची ओळख**

मुंबईच्या केया हटकरने अपंगत्वावर मात करत आपली ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रस्थापित केली आहे. तिच्या ‘डान्सिंग ऑन माय व्हिल्स’ आणि ‘आय एम पॉसीबल’ ही दोन्ही पुस्तके जागतिक स्तरावर नावाजले गेले आहेत. १३ वर्षांच्या केयाने दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला असून तिचे साहित्य २६ देशांमध्ये लोकप्रिय ठरले आहे. केयाला १० महिन्यांपासून स्पायनल मस्क्युलर अ‍ॅट्रॉफी (ड्च) या आजाराने ग्रसित आहे, ज्यामुळे ती कायम स्वरूपी व्हीलचेअरवर असते. मात्र, तिने हा आजार तिच्या यशाच्या मार्गातील अडथळा होऊ दिला नाही. तिच्या साहित्य व सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार’ ने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार वितरण कार्यक्रम नंतर राजधानीतील भारत मंडपम येथे केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाकडून आयोजित **पान २ वर**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली प्रधानमंत्री मोदी यांची सदिच्छा भेट



**नवी दिल्ली -** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ७ लोक कल्याण मार्ग येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी सहकुटुंबीय सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मुलगा लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि स्नुषा वृषाली शिंदे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी प्रधानमंत्री यांना पारंपारिक पैठणी शाल आणि पुष्पगुच्छ भेट दिली. प्रधानमंत्र्यांच्या भेटीनंतर श्री. शिंदे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत, ही भेट सदिच्छा भेट होती. तसेच, या भेटीत विकसित भारताच्या वाटचालीत राज्याचा योगदानाबाबत श्री. मोदी यांच्याशी चर्चा केली. प्रधानमंत्री श्री. मोदी यांनीही महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले असल्याचे सांगितले.

या दौ-या दरम्यान उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. यावेळी श्री. शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांना छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती आणि पारंपारिक शाल भेट दिली. तर केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांना प्रभू श्रीरामाची मूर्ती आणि पारंपारिक शाल भेट स्वरुपात दिली.

### भाजपा सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळा

## जिल्ह्यात पाच लाख सदस्य नोंदणी करणार - रावसाहेब दानवे



**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज गुरुवार (दि. २६) रोजी भारती लॉन्स, बालाजी चौक, जालना येथे भाजपा जालना जिल्हा सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात भारत माता, स्व.अटल बिहारी वाजपेयी व विर बाल दिवस म्हणून बाबा फतेह सिंग व बाबा जोरावर सिंग यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना जिल्ह्यात सदस्यता नोदणी अभियानांतर्गत पाच लाख सदस्य नोंदणी करणार आहे. जालना जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी आपल्या मेहनतीने विधानसभा निवडणुकीत मोठे यश संपादन केले. याच ऊर्जा आणि एकजुटीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्येही यश मिळवण्यासाठी प्रत्येक घराघरात पोहोचण्याचे काम या सदस्यता अभियानाद्वारे करावे लागेल. देशभरात चालू असलेल्या भाजप सदस्यता नोंदणी अभियानाच्या धर्तीवर जालना जिल्ह्यातील अभियानाची सुरुवात या कार्यशाळेद्वारे करण्यात आली. मंडळ स्तरावर कार्यशाळा आयोजित करून सदस्य नोंदणी करावी आणि अधिकाधिक लोकांना भाजपशी जोडण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे. भारतीय जनता पार्टी संघटनात्मक काम करणारी पार्टी असून लोकसभेमध्ये दोन सदस्य ते आज देशातील एक नंबरचा पक्ष त्याचबरोबर जगभरातील सर्वात मोठा सदस्य असणारा पक्ष अशी वाटचाल करणाऱ्या भाजपाचे स्वप्न अटलजींनी पाहिले होते ते आज पूर्ण होत आहे या गोष्टीचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याच बरोबर भाजपचे सदस्य होण्यासाठी ८८०००२०२४ या क्रमांकावर मिसकॉल करणे आवश्यक असून याद्वारे आलेल्या लिंक मध्ये नवीन सदस्याची माहिती भरावयाची आहे. प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी या अभियानाच्या **पान २ वर**

## युवा आदर्श हुर्डा ...

**शेतामध्ये ठाण मांडा**
**खायचा चविष्ट हुरडा**
**चटणी भरीत भाकरी**
**लसणाचा खमंग खर्डा**
**खोटा अहंकारी जोडा**
**दूरवरी कुठेतरी काढा**
**वावरा मधल्या मातीशी**
**अरे शहरी नाळ जोडा**
**अंग होई खिळखिळे**
**पळवायचा बैल गाडा**
**हिरवागार तो हरभरा**
**गाभूळल्या चिंचा तोडा**
**विहीरीत मजेत डुंबता**
**होऊन जाऊ द्या राडा**
**हसत कवेत घेणारं तो**
**जुनाट चौसोपी वाडा**
**परकेपणा विसरू जा**
**मस्त गप्पा गोष्टी झोडा**
**जमिनीची सर न मुळी**
**त्या गाद्या गिरद्यालोडा**
**प्रदुषित झाल्या मनाले**
**विरंगुळा मिळेलं थोडा**
**टिकवायला हवीत गावे**
**रे शहरी हव्यास सोडा**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## प्रौढ साक्षरता ही काळाची गरज - अ‍ॅड. अश्विनी धन्नावत

### इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे प्रौढ शिक्षण अभियान

**जालना । प्रतिनिधी -** शिक्षण ही आधुनिक काळाची गरज आहे. प्रत्येकाने साक्षर झाले तर दैनंदिन कामात आणि व्यवहारात येणाऱ्या अडचणीवर मात करता येईल व दुसऱ्यावर विसंबून राहायची गरज भासणार नाही. महिलांनी साक्षर असणे तर अत्यावश्यकच आहे. कारण महिला शिकली तर सर्वं कुटुंब शिक्षित होते. या एकंदरीत परिस्थितीचा विचार करून इनरव्हील क्लब जालना होरायझनने पुढाकार घेतला असून, प्रौढ शिक्षण व महिलांच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असे प्रतिपादन क्लबच्या अध्यक्ष ड.अश्विनी धन्नावत यांनी केले.




इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे ऑगस्ट महिन्यापासून साक्षरता अभियान हाती घेण्यात आले असून, ते किमान २० गावांमध्ये मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबविण्याचा क्लबचा मानस आहे. सध्या जामवाडी केंद्रांतर्गत जामवाडी, श्रीकृष्णनगर, पानशेंद्रा, वंजार उमरद, गुंडेवाडी, तांदुळवाडी, गोकुळवाडी, खरपूडी, चौधरीनगर तसेच देवमूर्ती येथील उर्दू व मराठी माध्यम शाळेत गावातील निरक्षर प्रौढांसाठी साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले आहेत. सौ. अ‍ॅड. अश्विनी धन्नावत आणि सचिव अ‍ॅड. पिंकी लड्डा यांनी देवमूर्ती शाळेत चालणाऱ्या वर्गाला भेट दिली, त्यावेळी ड. धन्नावत बोलत होत्या. याप्रसंगी जामवाडीचे केंद्रप्रमुख सुनील ढाकरगे, देवमूर्ती शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थ, स्वयंसेवक व गावातील प्रौढ निरंक्षर महिलांची उपस्थिती होती.

अ‍ॅड. धन्नावत पुढे म्हणाल्या की, प्रौढ शिक्षण कार्यक्रमाला सहकार्य करणारे **पान २ वर**

## जालना जनसेवा ग्रुप गरीब मुलींचे विवाह लावून देणार

### सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्या विशेष सहकार्याने स्तुत्य उपक्रम साकारला जाणार

**जालना । प्रतिनिधी -** सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा उद्योजक पन्नालाल बगडिया यांच्या पुढाकारातून जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने सामाजिक बांधिलकीची अद्भुत प्रेरणा देत ११ गरीब मुलींच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या विवाह सोहळ्यात नवविवाहित जोडप्यांना संसार उपयोगी सर्व साहित्य प्रदान करून त्यांच्या संसाराचा आरंभ सुकर करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे.

सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून देत जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने ११ गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींचे सामूहिक विवाह लावून देण्याच्या स्तुत्य उपक्रमाची संकल्पना ही पन्नालाल बगडिया यांची आहे. हा आदर्श विवाह सोहळा फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात येणार असून, या उपक्रमाद्वारे समाजात सकारात्मक संदेश देण्याचा जनसेवा ग्रुपचा मानस असल्याची माहिती ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला यांनी दिली. पन्नालाल बगडिया म्हणाले की, सौ जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टने नेहमीच समाजातील दुर्बल घटकांसाठी काम केले आहे आणि हा विवाह सोहळा **पान २ वर**

जालना जनसेवा ग्रुप हा आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात अनेक उपक्रम राबवित आहे. आता सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्या योगदानातून यावर्षीपासून अकरा गरीब मुलींचा विवाह लावण्याचा उपक्रम राबवित आहोत. आर्थिक अडचणींमुळे अनेक गरीब कुटुंबांना त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी संघर्ष करावा लागतो. जालना जनसेवा ग्रुपने या गरजांची पूर्तता करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

**- पुरुषोत्तम मोतीवाला, अध्यक्ष, जालना जनसेवा ग्रुप**

सामाजिक बांधिलकी ही केवळ शब्दांपुरती मर्यादित न राहता ती कृतीत उतरवण्याचा आम्ही नेहमी प्रयत्न करत आलो आहोत. गरजू कुटुंबांतील मुलींचे विवाह हा त्याच बांधिलकीचा भाग आहे. अनेक गरीब कुटुंबांना आर्थिक चणचणीतून आपल्या मुलींच्या संसाराची सुरुवात करणे कठीण होते. यामुळेच आम्ही जालना जनसेवा ग्रुपच्या माध्यमातून आणि सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने ११ गरीब मुलींचे लग्न लावून देण्याचा हा उपक्रम हाती घेतला आहे. समाजासाठी काहीतरी करण्याची ही भावना पुढे नेणारा हा उपक्रम आहे आणि आम्हाला आनंद आहे की जनतेने नेहमीच अशा उपक्रमांना भरभरून पाठिंबा दिला आहे.

**- पन्नालाल बगडिया, अध्यक्ष, सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट**

## संपादकीय पान

# ...तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतः सह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.



जुने जाऊ द्या मरणागुनी...
जाळूनी किंवा पुरूनी टाका....
या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

शिर्डी येथील तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद'; प्रत्येक मंदिरासाठी सुरक्षा समिती स्थापन करण्याचा मंदिर विश्वस्तांचा निर्धार!

# 'अँटी लँड ग्रॅबिंग' कायदा लागू करण्याची ८७५ हून अधिक मंदिर विश्वस्तांची एकमुखी मागणी!

**शिर्डी -** श्री साई पालखी निवारा, शिर्डी येथे २४ आणि २५ डिसेंबरला आयोजित करण्यात आलेल्या तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'च्या समारोपप्रसंगी प्रत्येक मंदिरांसाठी सुरक्षा समिती स्थापन करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. याचबरोबर मंदिरांच्या भूमीचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखण्यासाठी 'अँटी लँड ग्रॅबिंग' कायदा शासनाने तात्काळ लागू करावा यांसह एकूण १० ठराव 'हर हर महादेव'च्या गजरात एकमताने संमत करण्यात आले. मंदिर महासंघाच्या या मागण्या घेऊन लवकरच मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचे ठरवले असून त्यासाठी राज्याचे रोजगारहमी मंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांनी विशेष सहकार्य करू, असे आश्वासन दिले आहे.

या परिषदेसाठी 'श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट'चे विश्वस्त, पुण्याचे ग्रामदैवत श्री कसबा गणपति, भीमाशंकर देवस्थान, रांजणगाव आणि जेजुरी देवस्थान, श्रीक्षेत्र बेट कोपरगाव येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज समाधी मंदिर, अखिल भारतीय पुरोहित महासंघाचे प्रतिनिधी, श्री तुळजाभवानी पुजारी मंडळ, संत पिठांचे प्रतिनिधी यांच्यासह राज्यभरातून ८७५ हून अधिक मंदिर विश्वस्त प्रतिनिधी उपस्थित होते. यापुढील काळात देशासाठी आदर्श असे मंदिरांचे संघटन महाराष्ट्रात उभे करण्याचे निश्चय सर्वांनी केला.

एकमताने संमत करण्यात आलेले ठराव ! - मंदिरे, तसेच मंदिरांच्या भूमीवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात दर आठवड्यातून एकदा 'मंदिर तेथे सामूहिक आरती' करणे, काशी आणि मथुरा तीर्थत्रक्षेत्रांचा खटला जदलगती न्यायालयात चालवावा; सरकारने राज्यातील सर्व मंदिरे सरकारमुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत; मंदिरात भक्तांनी अर्पण केलेला निधी महाराष्ट्र सरकारने विकासकामांसाठी न वापरण्याची घोषणा करावी; धर्मादाय आयुक्त कार्यालये मंदिरांना विविध कारणांसाठी देणगी देण्यासाठी आज्ञापत्रे पाठवत आहेत. अशी नियमबाह्य सरकारी पत्रे महाराष्ट्र शासनाने रोखावीत आणि मंदिरांचा निधी केवळ धार्मिक कार्यासाठी




उपयोगात आणला जावा, अशी सूचना धर्मदाय आयुक्त कार्यालयाला करावी; महाराष्ट्रातील पौराणिक, ऐतिहासिक महत्त्व असलेल्य मंदिरांचा तात्काळ जीर्णोद्धार करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी; तीर्थक्षेत्रे, श्रीक्षेत्रे, गडकिल्ले यांवर असलेल्या मंदिरांवर झालेल्या अतिक्रमणाचे महाराष्ट्र सरकारने सर्वेक्षण करून तात्काळ ती अतिक्रमणे दूर करावीत; महाराष्ट्रातील 'क' वर्गवारीतील मंदिरे सर्व कागदपत्रे उपलब्ध करूनही 'ब' वर्गात वर्गीकृत केली जात नाहीत. याची शासनाने दखल घेऊन त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी; मंदिर परिसर मद्य-मांस मुक्त होण्यासाठी सरकारने अधिसूचना काढावी; राज्यातील मंदिरांच्या पुजार्यांना प्रतिमाह मानधन देण्याचा निर्णय घ्यावा !

मंदिरांच्या समस्यांवर चर्चा : दोन दिवसांच्या मंदिर परिषदेत मंदिरांच्या विविध समस्यांवर चर्चा, तज्ञ अन् मान्यवरांचे मार्गदर्शन, तसेच गटचर्चा आयोजित करण्यात आल्या. यात 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय', 'मंदिरांमधील वस्रसंहिता', 'धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि मंदिरांचा समन्वय' आदी विषय होते. त्यातून वरील ठराव संमत करण्यात आले.

# ई बी के उर्दू विद्यालयाची शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांनी घेतली लोणार सरोवर निर्मितीची माहिती

**टेंभुर्णी -** टेंभुर्णी येथील सेठ ईबीके विद्यालयाची एकदिवसीय शैक्षणिक सहल बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथील सरोवर येथे गेली. विद्यार्थ्यांनी विलोभनीय सरोवराविषयी व तेथील धारविषयी सखोल माहिती घेतली. नंतर विद्यार्थ्यांनी हिवरा आश्रम येथील मनमोहक अशा कृत्रिम बेटावर बोटीचा आनंद लूटला. सहलीची जबाबदारी शाळेतील शिक्षक फकरू कुरेशी व सय्यद समीर यांनी मुख्याध्यापक शेख सुमैय्या रोशन व शेख गयास यांच्या मार्गदर्शनाने उत्कृष्टरित्या पार पाडली. त्यांना शेख साबेर, शेख अबरार, शेख जुनेद,शेख जावेद, सय्यद वसीम, व प्रल्हाद मिसाळ यांनी सहकार्य केले.



# देशासह राज्यातील वनक्षेत्राताची घट अत्यंत चिंताजनक

राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून ठेपली आहे.कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत नेणारी बाब आहे.आज निसर्गावर सर्वंच काही अवलंबून आहे.आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसर्गाची संपूर्ण जळमुळ वनक्षेत्रावर अवलंबून असते.वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष,परंतु आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतःच्या स्वार्थासाठी कुऱ्हाड चालवून घनाघाती प्रहार केला आहे.आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून ग्लेशियर वितळणे,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन, अती उष्णता, अती पाऊस, सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे. आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्के असने गरजेचे आहे.परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. म्हणजेच राज्यासह देशातील वनक्षेत्र भरपूर पिछाडीवर आहोत.महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र म्हणजे मोठी धोक्याची घंटा आहे.देहरादून येथील फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला.हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो.वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पहाले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ,ओरिसा, तेलंगणा,या राज्यातील वनक्षेत्र गेल्या दोन वर्षांत वाढले आहेत.तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गणना होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे.इतर राज्याच्या तुलनेत जर महाराष्ट्राचा विचार केला वनक्षेत्राच्या बाबतीत अत्यंत निचकांक असुन गंभीर परिस्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबुन असते.त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षिर हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारा पाहिजे.आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी सरकारची स्विकारली पाहिजे.वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पडुन भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.आपण रोज मिडियाच्या माध्यमातून पहात असतो की,गावात, शहरात, कोणाच्या घरात,रोडवर हिंसक प्राणी(वाघ, बिबट्या,अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरतांना दिसतात.याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहेत.देशात हत्ती कर्नाटक व ओरिसा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्ती पैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येतांना दिसतात.यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ओडिशात गेल्या ११ वर्षांत ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार , विजेता झटका यामुळे त्यांचा मृत्यू झाला. अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून देशातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४ हा अहवाल सादर केला आहे. त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. वायुप्रदुषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातुन वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

पान १ वरुन

## महाराष्ट्राच्या करीना ...

करण्यात आलेल्या वीर बाल दिवसाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री श्रीमती अन्नपूर्णा देवी उपस्थित होते. हा कार्यक्रम युवा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या अतुलनीय गुणांची दखल घेऊन, भविष्यात नवीन भारताच्या निर्मितीसाठी लक्ष केंद्रित करण्यासाठी आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन भाषणात श्रीमती अन्नपूर्णा देवी यांनी मुलांच्या रचनात्मकतेला प्रोत्साहन देण्याचे महत्त्व सांगितले आणि वीर बाल दिवसाचे उद्देश स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुपोषित पंचायत अभियानाचे उद्घाटन केले. पोषण संबंधित सेवांची अंमलबजावणी बळकट करून आणि सक्रिय सामुदायिक सहभाग सुनिश्चित करून पोषण परिणाम आणि कल्याण हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमात पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेते आणि मान्यवर व्यक्तींसह सुमारे ३५०० मुले सहभागी झाली. मुलांनी विविध भारतीय संस्कृतींचे प्रतिनिधित्व करणारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले आणि विविध संस्कृतींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मार्च पास्टमध्ये भाग घेतला.

यासोबतच, युवा मनांना गुंतवून ठेवण्यासाठी, या दिवसाच्या महत्त्वाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि देशाप्रती धैर्य आणि समर्पणाची संस्कृती वाढवण्यासाठी देशभरात विविध उपक्रम राबवले जातील. चूर्ह्रीं आणि चूइहरीरीं पोर्टलच्या माध्यमातून परस्पर संवादात्मक प्रश्नमंजुषेसह ऑनलाईन स्पर्धांची मालिका आयोजित केल्या जातील. शाळा, बालसंगोपन संस्था आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये कथाकथन, सर्जनशील लेखन, भित्तीचित्रे तयार करणे यासारखे मनोरंजक उपक्रम हाती घेतले जातील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## प्रौढ साक्षरता ...

मुख्याध्यापक आणि शिक्षकांचा क्लबच्यावतीने विशेष गौरव केला जाणार आहे. ऑगस्ट ते एप्रिल-मेपर्यंत हे अभियान राबविले जाणार असून, सध्या ११ शाळांमध्ये प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत. आणखी किमान ९ शाळांचा सहभाग वाढविला जाणार आहे. ग्रामस्थ आणि मुख्याध्यापकांकडून मिळत असलेल्या प्रतिसादामुळे अभियानाचा विस्तार होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

## जिल्ह्यात पाच ...

माध्यमातून प्रत्येकाची स्वतंत्र सदस्य नोंदणी करायची असून प्रत्येक बूथवर २०० सदस्य होणे अपेक्षित आहे. आघाडी, मोर्चा यांच्या संयुक्त अभियानाच्या माध्यमातून बूथ स्तरावरील समाज घटकांना भाजपाशी जोडण्याचा उद्देश आहे. या माध्यमातून भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते पुन्हा एकदा बूथ रचनेच्या माध्यमातून लोकांच्या संपर्कात जावून त्यांची मते आजमावून घेणार आहेत. या मोहिमेचा जास्तीत-जास्त लोकांना भाजपा सदस्य बनवण्याचा व्यापक उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी नवनिर्वाचित निवडून आलेले आमदार आ.संतोष पाटील दानवे, आ.नारायण कुचे यांचा भाजपा जालना जिल्ह्याच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

माजी आ.विलासबापु खरात, जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रीत सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष सतिष जाधव, जालना जिल्हा प्रभारी ऐजाज देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील भाजपा जिल्हा पदाधिकारी, जि.प. प.स. सदस्य, मंडळ अध्यक्ष, नगरसेवक, मोर्चा व आघाडी अध्यक्ष व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जालना जनसेवा ...

हा देखील ट्रस्टच्या सामाजिक बांधिलकीचा आणखी एक आदर्श ठरणार आहे. गरीब कुटुंबातील पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

नवविवाहित दांपत्यांना संसार उपयोगी साहित्य दिले जाणार आहे. वयाची १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवदांपत्यांनाच नाव नोंदणी करता येईल. ग्रुपकडे प्राप्त होणाऱ्या अर्जानंतर कुटुंबाचा सर्वे करून आर्थिक परिस्थितीचे अवलोकन केले जाईल. गरजू असल्याची खात्री पटल्यानंतरच सामूहिक विवाहासाठी निवड केली जाईल. ११ नावे अंतिम झाल्यानंतर फेब्रुवारी महिन्यात विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाईल आणि नंतर तारीख व ठिकाण कळविले जाईल.

अधिक माहिती आणि नाव नोंदणीसाठी पालकांनी पुरुषोत्तम मोतीवाला ९५११२६५६५८, सुनील लाहोटी ९८३४६८९८९८, डॉ. रामनारायण जैस्वाल ९४२२२१९१२८, गोवर्धन अग्रवाल ८८८८८८१५५५, ड. आनंद झा ७९७२६४०२०४, श्रेनिक नानावटी ८६६८२६७०९४, गणेश अग्रवाल ९८२२०६४९६७, सुदेश करवा ७९७२७१३५३६, नरेश गुप्ता, ९८२२१८८९९४ सतीश राठी ७७९८२००१११, अनिल सोनी ९८२३०२८१०२, निखिल तायल ७५५८७१७७७३ अरुण लाहोटी ९४२२७२१०२२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जालना जनसेवा ग्रुप व जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने करण्यात आले.

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, प्रशिक्षण आणि वाचन संकल्प महाराष्ट्राचा यावर विशेष लक्ष केंद्रित करणार - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई -** देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे. यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व देऊन विद्यार्थी हिताला प्राधान्य देत राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, वाचन चळवळ वाढविणे आणि प्राध्यापकांचे प्रशिक्षण यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

मंत्री श्री. पाटील यांनी आज मंत्रालयात मंत्रीपदाचा पदभार स्वीकारला आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाला उच्च शिक्षणातील सुधारणेचा त्रिसूत्री कार्यक्रम दिला. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, विद्यापीठाचे कुलगुरू संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरण पोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. यासाठी विद्यापीठे, महाविद्यालय व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा'हा उपक्रम दि. १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राज्यात राबविण्यात येणार आहे. 'वाचन संकल्प महाराष्ट्र' या उपक्रमअंतर्गत महाविद्यालयीन,विभागीय आणि स्तरावर पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धांचे परिक्षकांकडून उत्कृष्ट परीक्षणाची निवड करून प्रोत्साहनपर प्रमाणपत्र आणि बक्षीसही जाहीर करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांबरोबरच प्राध्यापकांना सुद्धा आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार केले आहे २१व्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण असून भारताला जागतिक ज्ञान आणि महासत्ता बनवणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे या धोरणाची महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. असेही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) या गटातून मराठा समाजातील मुलांना व्यवसायिक विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. दरम्यान, राज्य शासनाने मराठा समाजातील मुलांना ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्र देणे बंद केले. त्याऐवजी सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग अर्थात एसईबीसी' प्रमाणपत्र देण्यास सुरुवात झाली. आता प्रवेश देणाऱ्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) विद्यार्थ्यांकडून ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्राची सक्ती केली होती. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले होते. या पार्श्वभूमीवर मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आवश्यक जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्यात येत असल्याची घोषणा आज केली त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# जालना क्रेडाईच्यावतीने आमदार अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार

## सकारात्मक विकास; जालना व्हिजनवर चर्चा



**जालना । प्रतिनिधी -** जालना क्रेडाईच्यावतीने गुरुवार दि. २६ डिसेंबर रोजी जालन्याचे नवनिर्वाचित आमदार अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जालना क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सचिव अविनाश भोसले, कोषाध्यक्ष विष्णू पाटेकर, सहसचिव शरद जयस्वाल, सदस्य रितेश मंत्री, वामनराव राऊत, चेतन मराठे, संदेश कक्कड, सुनील भावसार, चक्रधर खोतकर, गोपाल पवार यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन आ. खोतकर यांचा सत्कार केला. याप्रसंगी जालना क्रेडाई पदाधिकारी आणि सदस्यांची अनौपचारिक चर्चा करताना, आ. खोतकर यांनी जालन्याला सकारात्मक विकासाच्या दृष्टीने पुढे घेऊन जायचे आहे असे सांगून, जालना व्हिजनची संकल्पना विशद करून, विकासाच्यादृष्टीने आपण सर्वत्र एकत्र बसून चर्चा करू. जालना शहरासह मतदारसंघाचा सर्वांगीण विकास आज आपला ध्यास असल्याचे ते म्हणाले. यावेळी आ. खोतकर यांनी बांधकाम व्यवसायिकांच्या समस्या आणि अडचणी जाणून घेतल्या.

# परतूर पोलिसांनी कत्तली साठी आणलेले गोवंश जनावराची केली सुटका



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरात दि.२६/१२/२४ रोजी परतूर पोलिसांनी कुरेशी मोहल्ला परतूर येथे छापा घातला असता आरोपी नामे, मुक्तार उर्फ पाशा कुरेशी, युनूस मोहमद हनीफ कुरेशी रा. कुरेशी मोहल्ला परतूर यांच्या ताब्यात कत्तली साठी आणलेले १ मोठा बैल आणि ४ वासरे ( कालवड) तसेच आरोपी नामे , अरेफ फत्तू कुरेशी रा. कुरेशी मोहल्ला परतूर यांच्या ताब्यात २ वासरे ( कालवड) असे एकूण ७ जनावराना ताब्यात घेऊन सुटका केली आहे, सदर जनावरे यांची देखभाल करण्यासाठी नगर पालिका परतूर यांच्या ताब्यात देण्यात आलेली असून आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करून कारवाई केली आहे. सदरची कारवाई जालना पोलीस अधीक्षक,अजय कुमार बंसल. अप्पर जालना पोलिस अधीक्षक, आयुष नोपाणी. परतूर उप विभागीय पोलिस अधिकारी, दादहरी चौरे. यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर पोलीस निरीक्षक, एम.टी.सुरवसे. विठ्ठल केंद्रे , पो उप नि, पोका/ सतीश जाधव, पॉका/दीपक आडे, पोका/ भागवत खाडे मपोका / कल्पना धडे, यांनी केली आहे.

# नवनाथ आडे यांची राष्ट्रीय बंजारा परिषदच्या परतुर तालुका अध्यक्षपदी निवड

**परतूर । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील बंजारा समाजाचे नवनाथ आडे यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय बंजारा परिषदेचे जिल्हा अध्यक्ष राजेश पवार यांनी राष्ट्रीय बंजारा परिषदच्या परतुर तालुका अध्यक्षपदी नवनाथ आडे नायक यांची निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक वअभिनंदन होत आहे.

नवनाथ आडे यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व संघटन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहता राष्ट्रीय बंजारा परिषदच्या परतुर तालुका अध्यक्षपदी नवनाथ आडे यांची नियुक्ती राष्ट्रीय बंजारा परिषदचे जिल्हाध्यक्ष राजेश पवार यांच्या आदेशाने व महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकारी यांच्या सहमतीने यांची राष्ट्रीय बंजारा परिषदच्या तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये संघटना बांधणीसाठी व संघटनेचे कार्य समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे काम आपल्या माध्यमातून करण्यात यावे यासाठी बंजारा परिषदचे सर्व प्रदेश पदाधिकारी, विभागीय पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून पुढील ध्येयधोरणे राबवावीत तसेच बंजारा समाजाला मान, सन्मान, न्याय, हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी कार्य करावे. आपण लोकशाही मार्गाने तसेच भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत राहुन समाजहित, जनहित, राष्ट्रहित जोपासून संघटनेचे संवर्धन करावे आणि संघटना वाढीसाठी प्रयत्न करावे असे त्यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रकात म्हटले आहे.



यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष श्रीकांत राठोड, संदीप राठोड, अनिल पवार, राजू राठोड, वसंत राठोड,संतोष राठोड आदींची उपस्थिती होती.



# हमजा किराणा दुकानाच्या गोदामास आग, लाखोचे नुकसान

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रहेमानगंज येथील हमजा किराणा दुकानाचे नवीन एमआयडीसी फेज २ मधील एकतानगर शिवा धाब्याजवळील गोदामाला शॉर्ट सर्कीटमुळे लागलेल्या आगीत किराणा सामान व इतर ऐवज असा लाखोचे ऐवज जळून खाक झाला आहे. ही घटना २६ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजता घडली.

या आगीमध्ये गोदामातील शॉम्पु, डायपर, नमकीन, बिस्कीट, कॉसमेटीक, बिस्कीट, डिओ स्प्रे, इलेक्ट्रीक वायरिंग, सिलींग, पीयुपी असा ऐवज जळून कोळसा झाला. आगीची माहिती सकाळी ७ वाजता हमजा किराणा दुकानाचे संचालक सिराज हमजा शेख यांना मिळाली. त्यांनी तात्काळ जालना अग्नीशमन विभागाच्या अधिकार्यांना माहिती दिली. अग्नीशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून, २ तासात सकाळी ९ वाजेपर्यंत आग विझविली. सुदैवाने यात कुठेही जीवीत हानी झाली नाही.

तर लाखोचा ऐवज जळून मोठे नुकसान झाले आहे. आग विझविण्यासाठी मुख्य अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे यांच्यसासह विनायक चव्हाण, फायरमन किशोर सकट, अशोक गाढे आदिंनी सहकार्य केले. याबाबत रात्री उशिरा चंदनझिरा पोलिस ठाण्यात जळीताची नोंद घेण्याची प्रक्रिया सुरू होती.

## विविध उपक्रमांनी जालना पब्लिक स्कूल येथे नाताळ उत्साहात साजरा

# जिंगल बेलच्या तालावर थिरकली चिमुकली!

**जालना । प्रतिनिधी -** येथील जालना पब्लिक स्कूलमध्ये नाताळनिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सांताक्लॉज ची वेशभूषा करीत, एकमेकांना भेटवस्तू देत,व मिठाई भरवत नाताळ निमित्त शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी शिक्षकांना व एकमेकांना विविध प्रकारची आकर्षक ,हस्तलिखित ग्रीटिंग कार्ड्स देऊन शुभेच्छा दिल्या.सांताक्लॉजच्या वेशभूषांमध्ये चिमुकल्यांनी आपली वेशभूषा करून व जिंगल बेल च्या तालावर उत्कृष्ट नृत्य सादर करुन उपस्थितांची वाहवा मिळवली. शाळेमध्ये क्रिसमस ट्री ची आकर्षक सजावट करून, त्याचबरोबर स्वतः विद्यार्थ्यांनी स्नो हाऊस तयार करून ख्रिसमस साजरा केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान मुख्याध्यापक श्रीमती कीर्ती पवार यांनी भूषविले, सूत्रसंचालन श्रीमती दीपाली हजारे यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षिका नेहा राठोड यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती पूजा गावंडे, निकिता फोके, अनिता काळे, रेखा कोल्हे, ऋतुजा हिवाळे, अश्विनी हिवराळे, अश्विनी भोकरे, स्नेहा पवार, जयश्री गायकवाड, नंदा तारख तसेच सेविका श्रीमती वर्षा दळवी ,मीना पांढरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# शिवसेनाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



**घाटकोपर । प्रतिनिधी -** शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ माजी नगरसेविका डॉ.भारती सुबोध बावदाने व शिवसेना विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने आयोजित वेदांत हॉस्पिटल व ईशा नेत्रालय यांच्या वतीने निळकंठेश्वर मंदिर वर्षानगर आणि उपाध्यय सोसायटी वर्षांनगर याठिकाणी मोफत रक्त तपासणी, आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी व मोफत औषध उपचार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये उपचाराधिन आढळलेल्या रुग्णांवर मोफत हृदयरोग व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.या शिबिराचा विभागातील स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.

यावेळी हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी शिवसेना व महायुतीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कठोर परिश्रम घेतले.

तसेच वेदांत हॉस्पिटल व ईशा नेत्रालय यांच्याही सर्व वरिष्ठ डॉक्टर व त्यांच्या टिमचे या शिबिराला मोलाचे सहकार्य लाभले असून आयोजक डॉ.भारती बावदाने व सुबोध बावदाने यांनी सर्व डॉक्टर व त्यांच्या टिमचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

आ. लोणीकर पाचव्यांदा आमदार झाल्याबद्दल तसेच लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त परतुर तालुक्यात विविध कार्यक्रम संपन्न

# गोरगरीब दीनदुबळ्या, रुग्णांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन होणे अतिशय गरजेचे - आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** आरोग्य हा प्रगतीचा कणा असून, आज परतुर येथे मोफत सर्व रोग निदान शिबिर आयोजित करून, मोठे पुण्याचे काम असून आज या ठिकाणी जालन्यातील तज्ञ डॉक्टरांची टीम आल्याने ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांना खूप मोठा दिलासा असल्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

ते परतूर येथे इंदिरा मंगल कार्यालयात भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांनी आयोजित केलेल्या मोफत सर्व रोगनिदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून अनेक पीडित रुग्णांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, आधी योजनांच्या माध्यमातून आपण स्वतः पुढाकार घेऊन अनेक गरजू रुग्णांना मदत केली असल्याचे यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले

पुढे बोलताना ती म्हणाली की, परतूर येथील उपजिल्हा रुग्णालयाला लवकरच निधी प्राप्त होईल व परतुर तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना, खाली का जालना परभणी अशा शहरात जाण्याची गरज पडणार नाही असेही यावेळी त्यांनी सांगितले

यावेळी या सर्व रोग निदान शिबिरामध्ये १२७५ रुग्णांच्या तपासण्या व उपचार करण्यात आले

भारतीय स्टेट बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या, सुकन्या योजना, महिला बचत गट खाते, बचत खाते या संदर्भामध्ये तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामध्ये, बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, भारतीय स्टेट बँकेने, अशा प्रकारचे खाते उघडण्याचे शिबिर आयोजित करून स्तुत्य उपक्रम राबवला असल्याचे मत यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणाप्रमाणे, देशातील शेवटच्या नागरिकाचे खाते बँकेत असली पाहिजे, शासनाची सर्व लाभ थेट या खात्यावर जमा झाले पाहिजेत, यासाठी हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा असून, महिला बचत गटांनाही अतिशय पूरक असा उपक्रम बँकेने राबवल्याबद्दल बँक कर्मचाऱ्यांचे लोणीकरांनी अभिनंदन केले, देशाला समृद्धीकडे नेण्यासाठी महिला सक्षमीकरण गरजेचे असून महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून छोटी मोठी कर्जे बँकेकडून घेऊन उद्योगधंदे उभारल्यास खऱ्या अर्थाने आर्थिक उन्नती साधली जाईल असे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मतदारसंघांमध्ये अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले गेले अनेक मान्यवरांनी मला शुभेच्छा दिल्या यामुळे मी सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करतो येणाऱ्या काळात कधीही आवाज द्या मी तुमच्या सर्वांसाठी तत्पर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह संजीवनी हॉस्पिटल डॉक्टर बळीराम बागल डॉक्टर अरविंद मस्के डॉक्टर विष्णू भुते डॉक्टर राजगुरू डॉक्टर सतीश सोळंके डॉक्टर अमोल पाटील डॉक्टर सचिन वाघ डॉक्टर चैतन्य कदम डॉक्टर निशांत गोयल डॉक्टर तुषार अग्रवाल डॉक्टर संदीप देशमुख डॉक्टर प्रचूर दहिवाळ डॉक्टर संदीप पाटील डॉक्टर बाहेकर साहेब डॉक्टर संजय पुरीडॉक्टर बांगड डॉक्टर प्रमोद आकात डॉक्टर स्वप्नील मंत्री डॉक्टर संदीप चव्हाण डॉक्टर ठाकूर डॉक्टर नवल डॉक्टर मोरे डॉक्टर तारे डॉक्टर डॉक्टर भानुदास कदम डॉक्टर रवींद्र बरकुले डॉक्टर रवींद्र गायकवाड डॉक्टर कराड डॉक्टर अजित पोरवाल डॉक्टर शेळके डॉक्टर सोमनाथ रेपे डॉक्टर योगेश कदम भाजप आता अध्यक्ष शत्रुघ्न कणसे रमेश भापकर संपत टकले प्रवीण सातोनकर, कृष्णा आरगडे, शिवाजी पाईकराव, दिगंबर मुजमुले, सनी तनपुरे, बंडू मानवतकर, यांची तर

तहसील कार्यालयामधील बँक मेळाव्यामध्ये विभागीय व्यवस्थापक ठाकूर व्यवस्थापक सावजी परतुर येथील शाखा व्यवस्थापक श्री अग्रवाल यांच्यासह मोठ्या संख्येने महिलां पुरुषांची उपस्थिती होती.

# मंत्रालयातील माहिती विभागाचा पत्रकार कक्ष सर्व पत्रकारांसाठी खुला

**मुंबई -** महाराष्ट्र सरकारच्या माहिती विभागाच्या वतीने मंत्रालयातील शासकीय बैठका, पत्रकार परिषदेचे वार्तांकन पत्रकारांना सुलभ व्हावे म्हणून मंत्रालयाच्या तळमजल्यावर माहिती व जनसंपर्क विभागाचे शेजारी पत्रकार कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच माहितीचे जलद गतीने आदान प्रदान करण्यासाठी संगणकासह इंटरनेट सेवा निशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे मंत्रालयात व विधानसभा मंडळातील कामकाजासाठी ही सुविधा सर्व पत्रकारांना उपलब्ध करून देण्यात आली असताना मंत्रालय व विधिमंडळ पत्रकार संघ या अनोंदणीकृत नावाने काही पत्रकारांनी या पत्रकार कक्षाचा ताबा घेऊन ठराविक पत्रकारांनीच या कक्षाचा वापर अनेक वर्ष चालू ठेवला होता. तसा प्रकारचा बोर्ड व संचालक मंडळ बोर्ड पत्रकार कक्षात व बाहेर लावण्यात आला आहे.

विधिमंडळ व मंत्रालय संपादक पत्रकार संघ या नोंदणीकृत संस्थेचे अध्यक्ष इलियास खान पठाण यांनी माहितीच्या अधिकारात वरील ताबेदारीचा प्रकार उघड केला व माहिती विभागाच्या विभागाचे महासंचालकांना सदर पत्रकार कक्ष सर्व पत्रकारांना खुला करावा असे पत्र लिहून विनंती केली. या पत्राच्या संदर्भाने माहिती विभागाचे संचालक (वृत्त व जन संपर्क) दयानंद कांबळे यांनी दिनांक २० /१२/ २०२४ रोजी विधिमंडळ व मंत्रालय पत्रकार संघाचे अध्यक्ष इलियास खान यांना कळविले आहे की, मंत्रालयातील पत्रकार कक्ष व या कक्षातील इंटरनेट व संगणक सुविधा सर्व पत्रकारांसाठी निशुल्क उपलब्ध आहे. तसेच या कक्षात कोणत्याही संघटनेचे फलक महासंचालनालयामार्फत लावण्यात आलेला नाही असे कळविले आहे. त्यामुळे मंत्रालय व विधिमंडळ पत्रकार संघ या संस्थेचे अस्तित्व, बोर्ड हे अनाधिकाराने काही पत्रकारांनी निर्माण केल्याचे उघड झाले आहे.

पुढील काळात मंत्रालयातील शासकीय कामकाजासाठी आलेल्या पत्रकारांसाठी मंत्रालयातील पत्रकार कक्ष उपलब्ध राहील तसेच कोणत्याही संस्थेच्या नावाचे बोर्ड अथवा अधिकार दाखविता येणार नाही. असे विधिमंडळ व मंत्रालय संपादक पत्रकार संघ संस्थेचे अध्यक्ष इलियास खान यांनी नमूद केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.